**Indian Streams Research Journal**
**Volume 2, Issue. 1, Feb. 2012** प्रा. जवाहर लक्ष्मण मोरे **ISSN:-2230-7850**

ORIGINAL ARTICLE

# खंडोबाचे जागरण : पारंपरिकता आणि बदलते स्वरूप

**प्रा. जवाहर लक्ष्मण मोरे**
संतोष भीमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप
ता. द. सोलापूर जि. सोलापूर

**प्रस्तावना :—**

थोर संताची भूमी म्हणून महाराष्ट्राच्या मातीला ओळखले जाते. वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून महाराष्ट्रातल्या लोकांना संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम आणि संतमेळयातल्या अनेक थोर विभूतींनी पंढरपूरच्या विठठल दैवतास प्रमाण मानून अध्यात्म आणि धार्मिकतेची गोडी लावून दिली. भक्ती आणि श्रध्दा यांची सांगड घालून समाजप्रबोधनाचं कार्यही संतांनी केले आहे. परंतू या महाराष्ट्राच्या मातीला अजून काही लोकदैवताचं धार्मिक अधिष्ठान लाभले आहे. ते म्हणजे ग्रामदैवत आणि कुलदैवताची उपासना. भक्ती, श्रध्दा, भावना, वारसा परंपरा, रीतरिवाज इ. कारणांनी अनेक लोक अशा दैवताची उपासना करतांना दिसतात. जेरूरी, पालीचा खंडोबा, कोल्हापूरचा जोतिबा, तुळजापूरची तुळजाभवानी, जतची यल्लम्मा, चिंचणीची मायाक्का, माहूरची रेणुका या लोकदैवताची यात्रा आजही मोठया प्रमाणात भरतांना दिसते. या दैवताच्या भक्तामध्ये श्रध्दा आणि धार्मिकता यांचे अधिष्ठान असले तरी नवस, अंधश्रध्दा, नरबळी व पशुबळी यांचेही प्राबल्य दिसते. अलिकडच्या काळामध्ये नवस—सायासाचे प्रकारही खूप बदलतांना दिसतात. देवाच्या नावाने आईवडील स्वतःच्या अपत्यास देवाला सोडतात किंवा वाहले जाते. यल्लम्मा देवीस जोगता व जोगतीण, खंडोबा देवास वाघ्या व मुरळी, मरीआई किंवा लक्ष्मीआईस पोतराज अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. विज्ञान युगात आणि पुरोगामी महाराष्ट्रात याचा सुकाळ आला आहे. देव, धर्म, आणि श्रध्देच्या नावाखाली अनेक अनैतिक प्रकार व ओंगळवाणे रूप पहावयास मिळते. पु—या महाराष्ट्राचा लोकप्रिय असलेला खंडोबा या लोकदैवताचा विचार केला तर वाघ्या आणि मुरळी यांचे भवितव्य आणि अस्तित्व लक्षात येईल. त्यांच्या जागरण या विधीनाटयाची परंपरा आणि बदलते वास्तव स्वरूप याचा उहापोह प्रस्तुत लेखात करावयाचा आहे.

**खंडोबा महाराष्ट्राचे प्रसिध्द लोकदैवत :—**

मुळचा कर्नाटकातील मैलार म्हणून प्रसिध्द असलेल्या या लोकदैवतास महाराष्ट्रात मल्हारी, मार्तंड, खंडोबा या नावांनी ओळखले जाते. लौकिक श्रध्दा आणि अलौकिक भक्ती म्हणून खंडोबाकडे पाहिले जाते.[१] महाराष्ट्रातील हे लोकप्रिय आणि प्रसिध्द दैवत असून लोकजीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. मणि आणि मल्ल या राक्षसांचा वध केल्याने खंडोबा हा वीरपुरूष असल्याचे सिध्द होते. ऐतिहासिक वीरपुरूष असल्याने लोकांनी आणि भक्तांनी खंडोबाला कृतज्ञतेने दैवताचे स्वरूप दिल्याचे दिसते. जनमानसात अशा अनेक देवता आहेत की, ज्याने मुलतः मनुष्य रूपाने इतिहासावर ठसा उमटवून आपले वर्चस्व गाजवले. त्याच प्रक्रियेतील खंडोबाची निर्मिती झाली असावी. असे रा. चि. ढेरे मत नोंदवतात.[२] एकविसाव्या शतकातही खंडोबाची यात्रा अनेक ठिकाणी मोठया स्वरूपात भरते. पुणे जिल्हयातील जेजुरी, सातारा जिल्हयातील पाली, उस्मानाबाद जिल्हयातील नळदुर्ग, अणदूर, सोलापूर जिल्हयातील बाळे व बेळगाव जिल्हयातील मंगसुळी इ. महाराष्ट्रातील आणि कर्नाटकातील अनेक उदाहरणे देता येतील. खंडोबा हा स्वाभिमानी आणि वीरांचा देव आहे. याची भक्ती जर विधीपूर्वक केली तर वाईट कर्माच्या दैत्याचा संहार होतो.[३] या धार्मिक आणि श्रध्दाळू भावनेने खंडोबा हे लोकदैवत महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्रप्रदेशात प्रसिध्द आहे.

## 'जागरण' या विधीमागील धार्मिकता :–

खंडोबा हा जसा वीरांचा देव आहे तसा तो प्रपंचाचाही देव आहे. कारण कुटुंबात लग्न झाल्यानंतर नव वर–वधूंनी कुलाचार म्हणून जागरण हा विधी करणे आवश्यक असते. ज्यांचे कुलदैवत खंडोबा आहे अशांनी हा विधी प्रामुख्याने करावयाचा असतो. पण अलिकडे कोणीही हा विधी लग्नाच्या अगोदर, वास्तुशांती, वाढदिवस, अशा प्रसंगी, शिवाय समस्या निवारणासाठी व कौटुंबिक समाधानासाठी करत असल्याचे दिसते. जागरण हा शब्द 'जागर' या शब्दापासून तयार झाला आहे. तसेच जागरण म्हणजे स्वतः जागे राहून इष्ट देवतेला जागे ठेवणे होय, अशी व्युत्पत्ती व व्याख्या डॉ. प्रकाश खांडगे करतात.[४] सश्रध्द मनाने हा विधी पार पाडला जातो. वाईटाचा नाश होउन, समस्याचे निराकरण होउन कुटुंबामध्ये सुखशांती मिळावी या भावनेने जागरण घातले जाते. जागरणाच्या स्वरूपाविषयी विस्ताराने मांडणी करतांना डॉ. रा.चि. ढेरे लिहतात, 'पाच उसाच्या मखरात प्रतिकात्मक देवस्थापना करून, वाघ्या मुरळयांचा समूह तुणतुणे, घोळ व खंजिरी या वा्द्यांच्या साथीने खंडोबाची गाणी गाण्याचा जो कार्यक्रम करतो त्यास जागरण करणे किंवा जागरण घालणे' असे म्हणतात.[५] हा विधी साजरा करण्यामागे श्रध्दा, धार्मिक भावना असते. मनोभावे आणि निष्ठेने भक्तगण हा विधी साजरा करतात. काही भक्तगण मनातील इच्छा पूर्ण होण्यासाठी नवस बोलतात आणि इच्छा पूर्ण झाल्यावर नवस फेडण्यासाठी जागरण हा विधी आवर्जून करतात. नवस बोलणे आणि त्याची पूर्तता करणे याचेही प्रमाण अलिकडे वाढले आहे. शिवाय नवसाचे स्वरूपही बदललेले आहे, म्हणून ही परंपरा असली तरी, धार्मिकता म्हणून हा विधी केला जात असला तरी त्याच्या बदलत्या स्वरूपाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही असे मला वाटते.

## जागरण या विधीची पारंपारिकता आणि स्वरूप

एक धार्मिक विधी म्हणून भक्तगण हा विधी साजरा करतात. खंडोबाच्या उपासनेचा हा विधी आहे. हा विधाी वाघ्या, मुरळी यांच्यामार्फत केला जातो. खंडोबाच्या नवसाने जन्मलेल्या मुलास वाघ्या तर मुलीस मुरळी म्हणून सोडण्याची परंपरा आहे.[६] हेच वाघ्या आणि मुरळी देवाचे भक्त आणि उपासक बनतात. वाघ्या हा स्वतःचा संसार करून खंडोबाची सेवा करतो, पण मुरळीला मात्र लग्न, संसार करता येत नाही. कारण तिचे देवाबरोबर लग्न लावलेले असते हे दोघेजण आपापला पोशाख परीधान करून जागरण हा विधी पार पाडत असतात. हा विधी पूर्वरंग आणि उत्तररंग अशा दोन प्रकारात पार पडतो. पूर्वरंगात मूर्तीची प्रतिष्ठापना, गादी भरणे, घटस्थापना, गण, देवदेवतांना आवाहन, खंडोबाचे गुणगान यांचा समावेश असतो.[७] तर उत्तररंगात खंडोबाची संसार कहाणी, पराक्रम सांगणारे कथागीत किंवा पुराणातील घटना प्रसंगावर आधारित नृत्य, संगीत, नाटयाच्या माध्यमातून सादर केले जाते.[८] यामध्ये मुरळीच्या नृत्याविष्काराला विशेष महत्त्व असते. या विधीनाटयात वाघ्या मुरळी, साथीदारासोबत खंडोबा, म्हाळसा, बाणाई, जेजूरी, पराक्रम, लग्नसोहळा, तिघांच्या रूपाचे वर्णन, चमत्कार, अवतार अशा प्रसंगाचे वर्णन श्रृंगार आणि हास्यरसाची पेरणी करत रंजकता आणतात. शेवटी लंगर तोडून हा विधी संपवला जातो. एकूणच लोकदैवताची जनमानसातील प्रतिमा अलौकिकरित्या समोर ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न वाघ्या मुरळी करतात. आधुनिक काळात रसिकांची मानसिकता पाहूनही सादरीकरणात गरज म्हणून बदल केले जातात. यावेळी पारपरिकता बाजूला पडते हे नाकारून चालणार नाही. तरीही धर्मविधीचे अधिष्ठान म्हणून प्रथम पाहणे उचित ठरेल, शिवाय लोकसंस्कृती आणि लोकधर्माच्या संपन्नतेत वाघ्या मुरळीच्या परंपरेचा वाटा आहे हे निश्चित.

## आधुनिक काळातील जागरणाचे बदलते स्वरूप :–

देव–धर्म, परंपरा, भावना, श्रध्दाळूपणा, रीत, रूढ म्हणून आपण याकडे कितीही पाहत असलो तरी सखोल विचारांती जागरण या विधीच्या सादरीकरणामध्ये खूपच फरक पडलेला दिसतो, हे सर्वश्रृत आहे. पण मनोरंजन आणि ओंगळवाणा आनंद म्हणून याकडे पाहतात आणि विचार सोडून देतात. धर्माच्या पलिकडे जावून वाघ्या मुरळी यांचे बदललेले सादरीकरणाचे स्वरूप लक्षात घेण्याची आणि समाजासमोर मांडण्याची गरज बनते आहे. देवाला वाहलेली मुरळी आपलं

सारं आयुष्य आणि शरीर गावाच्या स्वाधीन करते, ती मुरळी गावभोगास बळी पडते. तेव्हा कोणता देव आणि धर्म तिचं रक्षण करतो. अर्थशून्य जगणंच तिच्या नशिबी येतं.[९] आणि हिच मुरळी जागरणाच्या वेळी देवीची उपासना करतांना दिसते. देव–धर्माचे नाव पुढे करून भक्त, वाघ्या मुरळी आणि रसिक यांच्या अभिव्यक्ती आणि आस्वादामध्ये खूपच बदल जाणवलेला दिसतो. तो पुढीलप्रमाणे –

१. अलिकडच्या काळात वाघ्या मुरळीच्या ताफ्यामध्ये स्पर्धा वाढली असून जी मुरळी तरूण, सुंदर, चांगली नृत्य करणारी आहे. त्याच पार्टीला आयोजक आणि रसिक पसंती देतात. यात देव, धर्म, श्रध्दा, धार्मिकता मागे पडते.
२. खंडोबाचे कथागीत व महिमा वर्णन करणारी गाणी न म्हणता सरळ सरळ चित्रपटातील उडत्या चालीची गाणी आणि अश्लिल लोकगीते वाघ्या, मुरळी, साथीदार नृत्याविष्कारासह सादर करतात. अशावेळेस लोकांना खंडोबाची कथा, पराक्रम याची गरज वाटत नाही.
३. बतावणी सादर करत असतांना विनोदामध्ये अश्लिल शब्दाचा वापर सर्रास केला जातो. मुरळी ही स्त्री असूनही त्यात सामील असते. तिला त्याचे काहीच वाटत नाही. पाहणा–या स्त्रिया कुटुंबासहित आलेल्या असतात याचेही कुणाला भान नसते. अश्लिल हावभाव, संवाद, शब्द यांचा वापर करून रसिकांचे रंजन करतात.
४. एखादी पार्टी जुनी असेल तर, पारंपारिक पध्दतीने जागरणाचा आविष्कार करीत असेल तर त्या पार्टीस कुणी सुपारी देत नाही त्यांनी पुढे काय करावे असा प्रश्न निर्माण होतो.
५. सध्याच्या वाघ्या मुरळीच्या सादरीकरणाला तमाशा आणि संगित बारीचे स्वरूप आले आहे. जागरण हा विधी पूर्वी रात्री १० ते ४ वाजेपर्यंत सुरू असायचा, शेवटी लंगर तोडूनच हा विधी सादर करतात, परंतु अलिकडे रात्री ९ ते १२ हा विधी सादर करतात, पारंपरिकतेवर भर न देता, लंगर न तोडता हा विधी उरकला जातो यावेळी धार्मिकता संपुष्टात आालेली असते.
६. मुरळया आपल्या सोयीनुसार, गरजेनुसार, स्वार्थानुसार पार्टी बदलतात, भाडे तत्वावर एका कार्यक्रमासाठी मुरळीला बोलवले जाते.
७. रसिकांच्या मागणीवरून गाणी सादर केली जातात तसेच विशिष्ट मुरळीनाच नाचवले जाते.
८. याही पलिकडे जावून सांगायचे झाले तर मुरळी हया अनैतिक मुलांना जन्मही देतांना दिसतात.
९. वाघ्याची दिमडी, मुरळीची घाटी, तुणतुणे, पेटी यापेक्षा कॅशिओ, कच्ची, ढोलकी या वाद्यांचा वाजवतांना वापर केला जातो.
१०. सांगली शहरातील मीनाबाई मुरळीच्या पार्टीमध्ये ३ ते ४ वर्षाच्या मुलीस मुरळीसोबत नाचवले जाते.[१०] म्हणजे खेळायचे आणि शिक्षणाचे वय असलेल्या लहान मुलीस हे लहानपणापासूनच मुरळी होण्याचे प्रशिक्षण दिले जाते असा अर्थ होतो.
११. स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी पारंपरिक वाघ्या, मुरळी आणि आधुनिक युगात वाघ्या मुरळी यांच्यात स्पर्धा सुरू असते. अशामध्ये देव–धर्म, श्रध्दा'निष्ठा विधी धार्मिकता या संकल्पना दूर फेकल्या जातात.

अशाप्रकारे मला जाणवलेले व प्रत्यक्ष पाहिलेले बदल वरीलप्रमाणे आढळून आलेले आहेत. यावर महाचर्चा होवून वेळीच काहीतरी पर्याय व उपाय शोधण्याची गरज आहे असे मला वाटते.

**निष्कर्ष :–**

१. वाघ्या, मुरळी, आयोजक आणि रसिक यांनी पारंपरिकतेला छेद न देता लोककला, कलेचे उपासक, देवाचे निस्सीम भक्त म्हणून या विधीकडे पाहता येईल.
२. मुरळी होण्यास कायद्याने बंदी असली तरी सांगली, जत, सांगोला इ. भागात अजूनही मुरळयांची संख्या वाढत आहे. यासाठी कायद्याची कडक अंमलबजावणी करून ती रोखता येईल.
३. बदलत्या रूप–स्वरूप, विकृतीचा अभ्यास अधिक करून समाजप्रबोधन करता येईल.
४. शिक्षणाचे महत्व पटवून देवून वाघ्या मुरळी यांना हयांच्या या व्यवसायातून परावृत्त करता येईल.

५. धार्मिकतेच्या नावाखाली चाललेला गोंधळ थांबवता येईल.
६. अनैतिक संबंधातून झालेल्या अपत्यांना बालकाश्रम, अनाथाश्रमात दाखल करून शैक्षणिक प्रवाहात आणता येईल.
७. सुशिक्षित आणि सेवाभावी सामाजिक संस्थांनी प्रबोधनाची जबाबदारी स्विकारून विकृत स्वरूपास आळा घालता येईल.
८. श्रध्दाळूपणाचा फायदा घेवून, प्रबोधन करून त्यांना पर्यायी दुसरे काम देता येईल का, याचा विचार करता येईल.
९. खंडोबाचे दैवतीकरण न करता त्याचे मानवीकरण सांगून स्वसंरक्षणासाठी व हितासाठी वीरता व पराक्रमाचे धडे सांगता येतील.
१०. प्रबोधन करतांना परिवर्तन म्हणून वाटचाल करता येईल. कारण परिवर्तन ही काळाची गरज बनली आहे.

**समारोप :–**

अशाप्रकारे निष्कर्ष असू शकतील. याहीपेक्षा जास्त निष्कर्ष असू शकतील. पण परिवर्तन करणे गरजेचे बनले आहे. नाहीतर देव धर्माच्या नावाखाली अंधश्रध्दा वाढत जावून लोककला बदनाम होईल याची भीती वाटते. पुरोगामी राज्यात मनोरंजनाच्या नावाखाली भोगवाद आणि चंगळवाद वाढला आहे. कामवासना, आसक्ती यांची वाढ होवू लागली आहे. धार्मिकतेच्या नावाखाली चाललेला किळसवाणा प्रकार समाज उघडया डोळयाने पाहत आहे, परिवर्तनासाठी निधळया छातीने पुढे येत नाही आणि जो येतो तो समाजकंटकांच्या गोळीला बळी पडतो. हे असंच चालत राहिले तर लोकसाहित्याच्या आणि लोककलेचा इतिहास बदलावा लागेल, नाहीतर वाघ्या मुरळीकडे लोककलेचे उपासक आणि जागरण हा विधी म्हणजे दैवताची सात्विक उपासना म्हणूनच स्वच्छ तन आणि पवित्र मनाने पाहिले तरच लोकसाहित्याच्या इतिहासाला आणि लोककलेला मानाचा दर्जा प्राप्त होईल.

**संदर्भ :–**

१. डॉ. ढेरे रा.चि. – दक्षिणेचा लोकदेव श्री खंडोबा, पद्मगंधा प्रकाशन, सदाशिव पेठ, आवृत्ती तिसरी, ऑक्टोंबर २०१२, पृष्ठ १५.
२. तत्रैव पृष्ठ २८.
३. वाळके मार्तंड – खंडोबाचं लग्न, प्राजक्त प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, एप्रिल २००९, पृष्ठ १९
४. डॉ. खांडगे प्रकाश, खंडोबाचे जागरण, लोकवाङ्मयगृह मुंबई, आवृत्ती पहिली मार्च २०१०, पृष्ठ १०.
५. डॉ. ढेरे रा.चि. – लोकसंस्कृतीचे उपासक, पद्मगंधा प्रकाशन, सदाशिव पेठ, आवृत्ती तिसरी, जुलै २००७, पृष्ठ १०.
६. डॉ. शिंदे विश्वनाथ – लोकसाहित्यमिमांसा, भाग पहिला, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस, पुणे, प्रथमावृत्ती १९९८, पृष्ठ १७९.
७. व्यवहारे शरद – लोकसंस्कृतीचा अंतःप्रवाह, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती जून १९९९, पृष्ठ ५३.
८. तत्रैव पृष्ठ ५५.
९. कांबळे बळवंत – देवदासी पोतराज, वाघ्या मुरळी, रूप–स्वरूप विकृती पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती, जून २००८, पृष्ठ १३९..
१०. वाघ्या मुरळी सादरीकरणाचे व्हिडीओ चित्रण.